MHLA050007022022

नियमित दरखास्त (लवाद) क्र. २१२३/२०२२
श्रीराम सिटी विरुध्द मुसादिक

**आदेश नि.क्र. १४ वर**

ऋणको क्रमांक १ व २ यांनी त्यांच्या विरुध्द दरखास्त एकतर्फा चालवण्याचा झालेला आदेश रदद करण्याची मागणी केली आहे.

२. या अर्जावर धनकोने म्हणणे देऊन अर्जास तीव्र आक्षेप घेऊन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. दोंन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. ऋणकोच्या वकीलांचे म्हणणे असे की, ऋणको हे कामधंद्यानिमित्त बाहेरगावी गेल्यामुळे त्यांना वेळेत हजर होता आले नाही. त्यामुळे त्यांच्या विरुध्द दरखास्त एकतर्फा चालवण्याचा आदेश झाला. या प्रकरणाचा निर्णय गुणदोषावर होण्यासाठी त्यांच्या विरुध्दचा आदेश रद्द करावा.

प्रस्तुतची दरखास्त ही रक्कम वसुलीसाठी असल्याने ऋणको विरुध्द झालेला एकतर्फा दरखास्त चालविण्याचा आदेश रद्द केल्यास गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे धनकोचे काहीही नुकसान होणार नाही. म्हणून हा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

ऋणको विरुध्द दरखास्त एकतर्फा चालवण्याचा
झालेला आदेश रद्द केला आहे.

**(प्र. अ. सवदीकर)**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
अहमदपूर.

दि. १९/०४/२०२४.